दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २५८ वा | शुक्रवार दि. १४ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## धनगर आरक्षणाचा मुद्दा पुन्हा लांबणीवर

**मुंबई ।** राज्यातील आदिवासी प्रवर्गातून आरक्षणा पासून वंचित असलेला समाज 'धनगड' की 'धनगर' आहे, यावर मुंबई उच्च न्यायालयात १३, १४ आणि २० जुलै रोजी नियमित सुनावणी होणं अपेक्षित होतं. मात्र राज्य सरकारतर्फे याप्रकरणी नवे महाधिवक्ता बीरेंद्र सराफ बाजू मांडणार असल्यानं त्यांना याचा अभ्यास करण्यासाठी वेळ हवा असल्याचं गुरूवारी स्पष्ट करण्यात आलं. याची नोंद घेत हायकोर्टानं त्यांची विनंती मान्य करत या प्रकरणाची सुनावणी ऑगस्टपर्यंत तहकूब केली आहे.



## न्यूज कॉलम

### दोडाईचा येथील पटेल कॉलनीत घरफोडी

**दोंडाईचा ।** शहरातील पटेल कॉलनीत चोरट्याने धाडसी घरफोडी करीत घरातील ३० हजारांच्या रोकडसह २८ हजार रूपये किंमतीची सोन्याची अंगठी मिळून एकूण ५८ हजार रूपयांचा मुद्देमाल लंपास केला. जयपालसिंग सुबेरसिंग राजपूत रा.रामी, ह.मु.पटेल कॉलनी, दोंडाईचा यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.८ ते ९ जुलै दरम्यान चोरट्याने त्यांच्या बंद घराच्या दरवाजाची कडीकोयंडा तोडून घरातील कपाटात ठेवलेली ३० हजार रूपयांची रोकड व २८ हजार रूपये किंमतीची सोन्याची अंगठी असा एकूण ५८ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल लंपास केला.

### महापालिका अतिरिक्त आयुक्तपदी करुणा डहाळे

**धुळे ।** महापालिकेच्या अति. आयुक्तपदी नाशिक महापालिकेच्या उपायुक्त करूणा वसंतराव डहाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अति. आयुक्त नितीन कापडणीस यांची बदली झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. उपायुक्त विजय सनेर यांच्याकडे अति. आयुक्त पदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. धुळे मनपाच्या अति. आयुक्तपदी नाशिक मनपाच्या उपायुक्त करूण डहाळे यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.

# उद्धव ठाकरेंनी २०१९ मध्ये जनादेशाची हत्या केली : फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

उद्धव ठाकरेंनी २०१९ मध्ये जनादेशाची हत्या केली आहे. रात्रदिवस युतीसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा विश्वास तोडण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केला आहे. त्यांनी माझ्या नव्हे तर भाजपच्या पाठीत खंजिर खुपसला आहे. असा घणाघात देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला. तर अशा प्रकारची बेईमानी किंवा अन्याय होईल, त्या-त्या एकनाथ शिंदे जन्माला येतील, असे प्रतिपादन फडणवीस यांनी केले.

भाजपच्या वतीने आयोजित 'मिशन २०२४' पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात ते कार्यकर्त्यांशी संवाद साधत होते. यावेळी त्यांनी २०१९ मध्ये युती तुटण्यामागील कारणे सांगत उद्धव ठाकरेंवर जोरदार निशाणा साधला. तर आता नव्याने शिंदे यांच्या नेतृत्वात झालेल्या युतीवर कौतुकाचा वर्षात केला. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीशी देखील केलेल्या युतीमागील निती सर्वांसमोर मांडली. आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपचे तयारी सुरू केली आहे. आज भिवंडी येथील महाविजय कार्यशाळेत भाजपकडून मोठं कुटुंब, सुखी कुटुंबचा नारा देण्यात आला. भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी ही घोषणा दिली असून स्थानिक पातळीवर शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटासोबत जुळवून घेण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. आशिष शेलार यांनी भाजपच्या प्रशिक्षण वर्गात मांडणी केली. आशिष शेलार यांनी यावेळी सोनिया गांधी आणि शरद पवार यांच्यावर टीकेचे प्रहार केले. सोनिया गांधी यांना मुलाची, तर शरद पवारांना मुलीची काळजी आहे. आता आपल्या सोबत खरी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस असल्याचे शेलार यांनी सांगितले. त्यामुळे भाजप पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेसोबत जुळवून घेण्याचे आवाहनही शेलार यांनी यावेळी केले.



### खोटी शपथ घेणारे हतबल झाले

**देवेंद्र फडणवीस म्हणाले की, २०१९ साली भाजप-सेनेचे पूर्ण बहुमत आले होते. पण त्यावेळी काही लोकांनी त्यात खडा टाकला. आता काही लोक खोट्या शपथा घेत आहेत. उद्धव ठाकरे पोहरादेवीला जाऊन खोटी शपथ घेतली. तेव्हा त्यांनी देखील देवीपुढे मनातल्या मनात माफी मागितली असेल. कारण ते आता हतबल झाले आहेत.**

### २०२४ मध्ये राज्यातून ४५ खासदार

**मोदी २०२४ मध्ये पुन्हा एकदा पंतप्रधान पदाची शपथ घेतील तेव्हा राज्यातले ४५ खासदार शपथ घेतील असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले. गेल्या ३२ वर्षांत देवेंद्र व माझ्यात एकमत राहिले आहेत. आम्ही तुम्हाला ९० टक्के स्ट्राईक रेट देऊ. पण ज्याप्रकारे तयारी सुरु केली आहे, नेते कुठेही मनाचे खच्चीकरण होणार नाही, याची काळजी घ्यावी असे आवाहनही बावनकुळे यांनी केले. एकनाथ शिंदे व अजित पवार यांनाही ती मदत कामाला येईल, असेही त्यांनी म्हटले. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी म्हटले की, १ लाख बूथवर आपण समिती करत आहोत. पेज प्रमुख गठीत करण्यात येणार आहे. एका लोकसभा मतदारसंघासाठी ५०० सोशल मीडिया वॉरीयर आपण करत आहोत असेही त्यांनी सांगितले. १६ जुलै रोजी पुन्हा १०० टिफिन बैठका घ्या, २८८ टिफिन बैठकांचे रिल्स तयार करण्याची सूचनाही बावनकुळे यांनी केली. त्याशिवाय, भाजपच्या पाठिंब्यासाठी ६० हजार मिस कॉल गेले पाहिजे. यानंतर सर्व कॉलिंग सरळ अँपच्या माध्यमातून होणार आहे असल्याची माहिती त्यांनी दिली.**

### ठाकरेंकडून वारंवार अडवणूक

**फडणवीस पुढे म्हणाले की, २०१९ मध्ये आम्ही युतीची बोलणी अंतिम टप्प्यात होती. परंतू उद्धव ठाकरे यांच्याकडून मुख्यमंत्री पदाची मागणी करण्यात आली. अमित शहांना फोन करून विचारणा केली. तेव्हा त्यांनी अगदी स्पष्ट सांगितले की, मुख्यमंत्री पद मिळणार नाही. तेव्हा त्यांनी उद्धवजी यांनी युती होणार नसल्याचे स्पष्ट केले आणि संवाद संपला. त्यांचे म्हणणे पालघरची जागा आम्हाला मिळाली पाहिजे. तेव्हा आम्ही उमेदवारासह त्यांना पालघरची जागा दिली.**

### तिन्ही पक्षांमध्ये समन्वय साधण्यासाठी समिती

**महायुतीमधील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये समन्वय साधण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये तिन्ही पक्षांमधील प्रत्येकी चार सदस्यांचा समावेश आहे. एकूण १२ सदस्य समन्वय साधण्याचे काम करणार आहेत. भाजपकडून चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, प्रसाद लाड, आशिष शेलार यांचा समावेश या समितीमध्ये करण्यात आला आहे. शिवसेना-शिंदे गटाकडून उदय सामंत, शंभूराज देसाई, दादा भुसे, राहुल शेवाळे समितीत चर्चा करणार आहेत. तर, राष्ट्रवादी काँग्रेसकडून समन्वय समितीवर सुनील तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे असणार आहेत.**

# भाजपच्या आमदारांमध्येही नाराजी: एकनाथ खडसेंचा मोठा दावा

**जळगाव । प्रतिनिधी**



राज्यात राजकीय भूकंप घडला आणि अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या आमदारांसह सरकारमध्ये सामील होऊन मंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र अजित पवारांसह शपथ घेणाऱ्या नेत्यांना अद्याप खाते मिळाले नाहीत. यावरून सत्ताधारी पक्षामध्ये धुसफूस सुरू आहे. या सर्व परिस्थितीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांनी भाजप आमदारांच्या नाराजीवर बोट ठेवलं आहे.

एकनाथ खडसे म्हणाले की, दहा दिवसांपूर्वी राज्यात मंत्रिमंडळ विस्तार झाला. मात्र खाते वाटप झालेलं नाही. यात अजित दादांना अर्थ खातं दिले जाईल हे निश्चित नाही, तो एक अंदाज आहे. तस पाहिलं तर गेल्यावेळी अजित दादांकडे अर्थ खातं असल्यामुळेच शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांच्या तक्रारी होत्या. आता पुन्हा अजित दादांना तेच खातं दिलं जात असेल तर शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांमध्ये नाराजीचा सूर दिसून येऊ शकते. मात्र त्यांना वरिष्ठ नेत्यांच्या निर्णय मान्य करावा लागेल. शिवसेना शिंदे गटाचे बरेच आमदार मंत्रिपदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत. अनेक आमदार सांगत आहेत की मी मंत्री होणार आहे. मी पालकमंत्री होणार आहे. मंत्रिमंडळ विस्तार आणि खाते वाटपानंतर नाराजी ही उफाळून येणार असल्याचा दावा खडसे यांनी केला. दरम्यान भाजपच्या आमदारांमध्येही नाराजी आहे. मात्र ते नाराजी बाहेर बोलत नाही. बाकीचे जसे उघडपणे बोलतात. ते बोलत नाही. भाजपने राष्ट्रवादीला सोबत घेतल्यामुळे भाजपमधील अनेक आमदार माझ्याशी बोलताना नाराजी व्यक्त करतात. राष्ट्रवादीला सोबत घेण्याच्या निर्णयाविरोधात ते नाखुश असल्याचे सांगतात, असंही खडसे यांनी नमूद केलं.

## धुळे मनपाची 'स्थायी'ची सभा तहकुब

**धुळे ।** महापालिकेच्या स्थायी समितीची सभा पुरेशा सदस्य संख्येअभावी तहकुब करण्यात आली. सभेला १६ पैकी केवळ दोनच सदस्य उपस्थित असल्याने सभापती सौ. किरणताई कुलेवार यांनी सभा तहकुब केली.

महापालिकेच्या सभागृहात स्थायी समितीची सभा किरण कुलेवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. यावेही अतिरिक्त आयुक्त विजय सनेर, नगरसचिव मनोज वाघ उपस्थित होते. तर सुनिल बैसाणे व साबीर शेख हे दोनच सदस्य सभागृहात हजर होते. त्यामुळे श्री.बैसाणे यांनी नियमानुसार सभेला किती सदस्य आवश्यक असतात? याची विचारणा नगरसचिवांना केली. त्यावर किमान पाच सदस्य असणे आवश्यक असल्याची माहिती नगरसचिवांनी दिली. त्यामुळे उर्वरित सदस्यांची पाच मिनीटे वाट पहावी, अन्यथा तहकुब करावी, अशी मागणी श्री.बैसाणे यांनी केली. त्यानुसार सभापतींनी पाच मिनीटांचा अवधी दिला. मात्र, त्यानंतरही सदस्य आले नाहीत. त्यामुळे राष्ट्रगिताने सभेची सांगता करण्यात आली.

# धुळ्यात काँग्रेस सेवा दलाची बैठक संपन्न



**धुळे । प्रतिनिधी**

धुळे शहरातील काँग्रेस भवनमध्ये काँग्रेस सेवा दलाची बैठक बुधवारी पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सेवा दलाचे राष्ट्रीय सेक्रेटरी तथा महाराष्ट्र प्रभारी लालजी मिश्रा होते. बैठकीला सेवा दलाचे महाराष्ट्र अध्यक्ष राकेश शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती.

मिश्रा व शेट्टी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना संघटनेची ध्येयधोरणे समजावून सांगितली. तसेच सेवा दलाचे संघटन वाढवून संघटनेचा विचार कार्यकर्त्यांमध्ये रुजवावा असे आवाहन केले. कार्यक्रमाला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते साबीर शेख, सेवा दलाचे माजी जिल्हाध्यक्ष रविंद्र चौधरी, जिल्हाध्यक्ष आलोक रघुवंशी, सरचिटणीस दीपक पाटील, शहराध्यक्ष राजेंद्र खैरनार, उपाध्यक्ष देशमुख, शिरपूर तालुकाध्यक्ष अजय पाटील, शिंदखेडा तालुकाध्यक्ष विनोद अहिरराव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सेवा दलाच्या कार्यकर्त्यांसह महिला कार्यकर्त्याही उपस्थित होत्या. राष्ट्रगीताने बैठकीची सांगता झाली.

## देवपूर परिसरात वृध्देच्या गळ्यातील सोनपोत ओरबाडली

**धुळे ।** देवपूर परिसरातील भगवती नगरात रहाणाऱ्या एका वृध्द महिलेच्या गळ्यातील सोनपोत दुचाकीवरून आलेल्या दोघां चोरट्यापैकी एकाने धूमस्टाईल ओरबाडत पोबारा केल्याची घटना घडली. शुभांगी उदय पुराणिक रा.नाशिक, ह.मु.इच्छापुर्ती गणपती मंदिराजवळ, धुळे या वृध्देने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या गणपती मंदिराजवळ आल्या असता मागावून दुचाकीवर आलेल्या दोघा तरूणांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील सोनपोत ओरबाडून पळून गेले. यावेळी सदर महिलेने प्रतिकार करताना चोरट्याच्या बोटाला चावा घेतला मात्र त्या अपयशी ठरल्या. दोघा अनोळखी चोरट्यांवर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# एस.टी.बसच्या काचा फोडण्याचे दिलं फर्मान

### रागातून चक्क बस चालकाचा प्रताप

### नंतर झाली चालकावर निलंबनाची कारवाई

**धुळे । प्रतिनिधी**

काल दुपारी बुलढाणावरून धुळ्याला जाणाऱ्या बसमध्ये जळगाव येथून धुळे आगारात बस चालक असलेले प्रभाकर बाजीराव पारधी हे बसले होते. त्यांना जळगाव ते धुळे दरम्यान असलेल्या मुकटी या गावी जायचे होते. परंतु ही बस मुकटी येथे न थांबविल्याने तसेच या बसला मूकटी या गावाचा थांबा नसल्याने चालकाने बस येथे थांबवली नाही. त्यामुळे प्रभाकर बाजीराव पारधी यांना राग आला.

त्यांनी फोनवरून गावातील पंधरा ते वीस तरुणांना बुलढाणा आगाराच्या बसवर दगडफेक करून या बसचे काचा फोडण्याचे सांगितल्याचा



धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धुळे आगाराच्या या पारधी नामक चालकाने बस मधूनच फोन केल्याचा व्हिडिओ बुलढाणा-धुळे बसच्या वाहकाने तयार केला. धुळे येथे पोहोचल्यावर बुलढाणा आगाराच्या वाहकाने चालकाची तक्रार देखील धुळे बस स्थानकात केली आहे. यामुळे मात्र बुलढाणा आगाराच्या या बस चालक आणि वाहकात वाद निर्माण झाला. एसटीचा बस चालकच एसटीवर दगडफेक करून काचा फोडण्याचे फर्मान देत असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. प्रभाकर बाजीराव पारधी या धुळे आगाराच्या बस चालकावर विभाग नियंत्रक विजय गिते यांनी तात्काळ आदेश देऊन निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# बल्हाणे शिवारातील दोन हातभट्ट्या पोलिसांकडून उद्धवस्त



### पिंपळनेर पोलिसांची कारवाई

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील बल्हाणे येथे असलेल्या दोन हातभट्ट्यांवर पिंपळनेर पोलीसांनी आज सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास धडक कारवाई केली. या दोन्ही कारवायांमध्ये सुमारे दिड लाखांचे साहित्य व दारुसाठा नष्ट करण्यात आला.

या कारवाईमुळे ग्रामस्थ व महिला वर्गाकडून समाधान व्यक्त होत जात आहे. पिंपळनेर पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्रीकृष्ण पारधी यांच्या पथकाने आज सकाळी बल्हाणे शिवारातील बाबचापाडा येथील नाल्या मध्ये सुरु असलेल्या अवैध हातभट्टीवर छापा टाकला. यावेळी अमृत देवाजी मोरे (३६) रा.बल्हाणे, ता.साक्री हा अवैधरित्या गावठी हातभट्टीची दारु गाळताना मिळून आला. पथकाने कारवाई करत एकूण १ लाख १० हजार रुपये किमतीचे साहित्य व दारूसाठा नष्ट केला. तर दुसरी कारवाई भटू रामदास माळी (२६) रा. बल्हाणे ता. साक्री याच्या अवैध हातभट्टीवर करण्यात आली. या ठिकाणी तो गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याच्या साहित्यासह दारू गाळताना मिळून आला. या कारवाईत एकुण ४९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

ही कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, साक्री उपविभागीय पोलिस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपळनेर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्रीकृष्ण पारधी, पोसई.बी. जी. शेवाळे, पोको राकेश बोरसे, सोमनाथ पाटील, कैलास कोळी, महाले यांच्या पथकाने केली.

# शस्त्र तस्करी 'कनेक्शन' कोठे : खरेदीदारांचाही शोध व्हावा!

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने दोन कारवाईत वेळीच शस्त्रे जप्त केल्यामुळे भविष्यातील अनर्थ टळला आहे खरा, परंतु ही शस्त्रे कोण घेणार होते ? कोणत्या टोळीतील होते ? याचाही शोध लागला पाहिजे. शंभर फुटी रस्त्यावर साताराच्या दोघा तस्करांना पोलिसांनी पकडले होते. त्यांच्याकडून मध्य प्रदेशमधील तस्करांची लिंक मिळाली. पण, सांगलीत कुणाला पिस्तूल विकणार होते ? गेल्या दोन महिन्यांत पाच खून झाले आहेत. यामध्ये दोन टोळीयुद्धातून होते. तर एक सुपारी देऊन झाला होता. या पार्श्वभूमीवर सापडलेली ही पिस्तुले कुणी मागवली होती हे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

अग्निशस्त्रे अर्थात पिस्तूल, रिव्हॉल्व्हर तयार करण्याचे कारखानेच या राज्यात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे देशी बनावटीची हत्यारे तेथे सहज उपलब्ध होतात. त्यामुळे त्यांचा बाजारही खुला असतो. हल्ली तेथेही पोलिसांनी कारवाया केल्याने या शस्त्रांच्या बाजारपेठांवरही संक्रांत आल्याचे अधिकारी सांगतात. तरीही अजून तेथे ही शस्त्रे कमी पैशात उपलब्ध होत असल्याचे स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने केलेल्या कारवाईवरून लक्षात येते. तस्कर अवघ्या पाच-दहा हजारांत तेथे पिस्तुले मिळवतात. ती पुढे विविध भागांतील ग्राहक शोधून ५० ते ६० हजार रुपयांत सौदा होतो. अर्थात हे ग्राहक म्हणजे गुन्हेगारच असणार हे उघड आहे. कारण अशा पिस्तुलांना परवाना कोण घेणार? आणि प्रशासन ते देणारही नाही. त्यामुळेच तस्करांच्या माध्यमातून गुन्हेगारी विश्वापर्यंत ही पिस्तुले पोहोच होतात. हत्यारे बाळगण्याच्या गुन्ह्यात आतापर्यंत अनेक जण सापडले आहेत. गरीब व झोपडपट्टीत राहणारी मुले त्यात प्राधान्याने दिसून येतात. कमी वेळेत जास्त पैसा मिळवणे तसेच या क्षेत्रातील आकर्षण यामागे कारणीभूत असल्याचे सांगण्यात येते. धमकावण्यासाठी तसेच वेगवेगळया गुन्ह्यांसाठी पिस्तूल व कट्ट्यांचा वापर केला जातो. असे गुन्हे करणार्यांची साखळीच आहे, त्याचा शोध वेळोवेळी सुरू असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी सांगतात. परराज्यातून स्वस्तात मिळणारी गावठी पिस्तुले पोलिसांची कायमची डोकेदुखी झाली आहे. दहा हजारांपासून तीस हजार रुपयांपर्यंत मिळणार्या या पिस्तुलांच्या जोरावर नाशिक परिक्षेत्रात गुन्हेगारी व अवैध धंदे फोफावले आहेत.

### अत्याधुनिक शस्त्रेही होतात तयार

**मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशातील ठराविक गावांमध्ये गावठी पिस्तुलांचे कारखाने आहेत. काही कारागीर तर चक्क चुलीवर धातू गरम करुन स्वस्त पिस्तुले बनवतात. काही अत्याधुनिक बनावटीची शस्त्रेही तयार होतात. इतर राज्यांत त्यांची राजरोस विक्री होते.**



### सोशल मीडियाद्वारे आकर्षण

**असंख्य तरुण काहीही काम नसल्याने कट्ट्यांवर बसून गप्पा मारतात. त्याचवेळी अनेक स्थानिक भाईगिरी करणार्या गुन्हेगारांचा रुबाब, त्यांची दादागिरी, आजूबाजूचे दुकानदार त्यांना देत असलेली इज्जत याचे आकर्षण या तरुणांमध्ये निर्माण होते. त्यातून ते या गुन्हेगारीकडे आकर्षित होतात. त्यांचे फोटो आपल्या सोशल मीडियावर स्टेटस म्हणून ठेवतात.**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

# कॅफेवर छापा, दोन जोडप्यांना समज देवून सोडले; चालकावर गुन्हा

**शिरपूर । प्रतिनिधी**

शहरातील करवंद नाका परिसरातील छापा टाकत पोलिसांनी कारवाई केली. तेथून दोन तरूण जोडप्यांना ताब्यात घेत त्यांना समज देवून सोडण्यात आले.

करवंद नाका येथील सॉलीड कॅफेमध्ये कॅफे चालक तरूणतरूणींना अश्लिल चाळे करण्यास जागा उपलब्ध करून देत असल्याची माहिती काल पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक ए.एस. आगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक छाया पाटील, यांच्या पथकाने दुपारी १२ वाजेच्या सुमारास कॅफेवर छापा टाकत तपासणी केली. तेव्हा तेथे एका खाजगी जागेवर तरूणतरूणींचे दोन जोडपे आढळुन आले. चौकशी करून, समज देवून त्यांना सोडण्यात आले. याबाबत पोलीस कर्मचारी अतूल निकम यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, कॅफे मालक राहुल सुरेश कोळी हा तरुण-तरुणींना कॉफी देण्याचे निमित्ताने अधिक पैसे आकारून कॅफेमध्ये असभ्य वर्तन करण्यासाठी बसण्यास जाग देत असल्यामुळे खाजगी जागा उपलब्ध करुन देत असल्यामुळे पसिरातील नागरिकांना त्यांचा त्रास होत असल्याने तो उपद्रव करीत आहे, म्हणून त्यांच्यावर शिरपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## दीदींची मजबूत पकड

पश्चिम बंगालमध्ये पार पडलेल्या ग्रामपंचायत, पंचायत समित्यांच्या निवडणुकीत सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने घवघवीत यश संपादन केले आहे. ग्रामपंचायतींच्या ६३ हजारांपेक्षा जास्त जागांपैकी ३४ हजारांहून अधिक जागा तृणमूलने जिंकल्या आहेत. इतर कोणताही पक्ष त्याच्या जवळही नाही, त्यामुळे ग्रामीण बंगालमध्येही तृणमूलची सत्ता कायम राहणार असल्याचे या निवडणुकीने सिद्ध केले. ही निवडणूक हिंसाचारामुळे जास्त गाजली. मतमोजणी सुरु असतानाही हिंसक घटनांमध्ये काही जण मृत्युमुखी पडले आहेत. त्यावरून विरोधी पक्षांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेस यांच्यावर टीका केली असली तरी त्यास उत्तर देण्याचे कष्ट ममता बॅनर्जी यांनी घेतलेले नाहीत. उलट पक्षावर दाखवलेल्या प्रेमा बद्दल त्यांनी मतदारांचे आभार मानले आहेत. भारतीय जनता पक्ष दुसर्या क्रमांकावर असला तरी दोघांत अंतर फार मोठे आहे. डावे पक्ष आणि काँग्रेस अपेक्षेप्रमाणे तिसर्या आणि चौथ्या स्थानी आहेत. या सर्व विरोधी पक्षांनी निवडणुकीतील विजयाचे 'श्रेय' पोलिस, राज्य निवडणूक आयोग आणि तृणमूलने केलेल्या सत्तेच्या कथित गैरवापराला दिले आहे; पण अशा आरोपांमुळे या पक्षांचा काहीच फायदा होणार नाही. ममता बॅनर्जी यांच्या पुढे सशक्त आव्हान कसे उभे करावे हा त्यांचा प्रश्न कायम आहे.

केवळ ग्राम पंचायतीच नव्हे, तर पंचायत समित्या व जिल्हा परिषदांमध्येही तृणमूलने जिंकलेल्या जागा लक्षणीय आहेत. म्हणजेच जवळपास पूर्ण ग्रामीण बंगालमध्ये मतदारांचा कल तृणमूलच्या बाजूने आहे. सर्वसाधारणपणे लोकसभा, विधान सभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मुद्दे वेगळे असतात; पण याही निवडणुकीत तृणमूलने केंद्र सरकारला लक्ष्य केले होते. राज्याला मिळावयाचा निधी केंद्र सरकार मुद्दाम अडवून ठेवत आहे, हा त्यांचा आरोप त्यांनी प्रचारात ठासून मांडला. ग्रामीण रोजगार हमी योजना असो अथवा खासदारांना मिळणारा निधी असो, केंद्र सरकार पश्चिम बंगालवर अन्याय करत आहे हा त्यांच्या प्रचाराचा मुख्य मुद्दा होता. प्रचाराची आखणी ममता बॅनर्जी यांनी आधी पासून काळजीपूर्वक केली होती. गेल्या अकरा वर्षांत राज्य सरकारने केलेली विकास कामे जनतेला दाखवून देण्यासाठी पक्षाने एक पुस्तिका प्रसिद्ध केली होती. त्याचा प्रचार आपल्या मतदार संघातील कानाकोपर्यात करण्याची जबाबदारी प्रत्येक आमदारावर सोपवण्यात आली होती. या दुहेरी प्रचार तंत्रामुळे मतदार पुन्हा तृणमूलकडे आकर्षित झाले असावेत, असे मानता येते. गेली अनेक वर्षे येथे सत्तेत नसलेल्या डाव्या पक्षांकडे व काँग्रेसकडे या प्रचारास उत्तर नव्हते. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्याने भाजप राज्यास सूडबुद्धीने वागवत आहे, या तृणमूलच्या आरोपाचा भाजप प्रतिवाद करू शकला नाही. राज्यपाल आनंद बोस आणि राज्य सरकार यांचे संबंध ताणलेलेच आहेत. त्यामुळे जनतेच्या या कौलानंतर राज्यपालांनी राजीनामा द्यावा व राज्याबाहेर जावे, असे तृणमूलच्या एका नेत्याने म्हटले आहे. या सर्व घडामोडीत राज्यातील हिंसाचाराचा प्रश्न अनुत्तरित आहे. पश्चिम बंगालला राजकीय हिंसाचाराचा इतिहास आहे असे म्हटले जाते; पण तो बदलला का जात नाही? निवडणुकीआधीच राज्यात हिंसक घटना घडू लागल्या होत्या. मतदान सुरु होईपर्यंत त्या उग्र झाल्या. आतापर्यंत हिंसाचारात ५०च्या आसपास नागरिक मरण पावले. ते कोण होते? हिंसाचार घडवण्यास त्यांना कोणी उद्युक्त केले? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. अन्यथा निवडणूक हा लोकशाहीचा भाग आहे या म्हणण्यास अर्थ उरणार नाही. बंदोबस्तासाठी केंद्रीय दले येऊ दिली नाहीत, असा भाजपचा आरोप आहे. त्याचेही निराकरण झाले पाहिजे. अर्थात अन्य पक्ष सोवळे आहेत, असे म्हणता येत नाही. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आपले वर्चस्व वाढवण्याचा प्रयत्न सर्वांनी केला. हिंसाचारात त्यांचा हात होता की नाही हे तपासावे लागेल. केंद्र विरोधी भूमिका असो अथवा विकास कामांचा आधार असो, बंगालमध्ये ममता दीदींची पकड अजूनही मजबूत आहे हे मात्र या निकालांनी सिद्ध केले.

# मराठवाड्यात राष्ट्रवादीची 'घडी' विस्कटणार

एकेकाळी असलेले दिग्गज नेते शरद पवार व अजित पवार या दोघांच्या सध्याच्या राजकीय घडामोडीत मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेसची उरली-सुरली घडी विस्कटणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. प्रत्येक तासातासाला वेगवेगळ्या बातम्या व घडामोडी समोर येत असल्याने मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे कार्यकर्ते बिथरले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे दिव्यशक्ती आहे, असे बोलले जाते. ते काही चुकीचे नाही, याचा अनुभव केवळ देशभराच्या बाबतीतच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाबतीत अलीकडे अनेकदा पाहावयास मिळाला. उद्धव ठाकरे तसेच शरद पवार या दोन नेत्यांच्या पक्षाची अवस्था आज काय झालेली आहे हे कोणाला नव्याने सांगण्याची गरज राहिलेली नाही. भाजपचे चाणक्य म्हणून ज्यांची ओळख आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात ही एक मोठी जबाबदारी पेलत भाजप काय आहे हे दाखवून दिले. देशाचे गृहमंत्री तसेच भाजपचे नेते अमित शहा यांच्या दौऱ्यानंतर संपूर्ण मराठवाड्यात भाजपची लाट पसरली आहे. भाजपने मराठवाड्याकडे विशेष लक्ष केंद्रित केले आहे. राजकारण हे पूर्वीप्रमाणे तत्त्वनिष्ठ राहिलेले नाही. ते आता व्यक्तीनिष्ठ झालेले आहे. त्यामुळे आपला नेता कोण व आपण कोणाचे कार्यकर्ते आहोत त्यांच्याच पाठीशी राहण्याची आजकालची नीती झालेली आहे. येणाऱ्या लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीत व्यक्तीनिष्ठ राजकारणाचा परिणाम दिसून येईल. मराठवाड्यात या दृष्टीने लोकांची धारणा झालेली आहे. भविष्यात मराठवाडा हा भाजपचा मोठा गड म्हणून ओळखला जाईल, असे राजकीय भाकीत आहे.



मराठवाड्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद म्हणावी तेवढी नाही. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे तसेच पदवीधरचे सतीश चव्हाण हे दोघे नेते आहेत. प्रत्यक्षात बीड जिल्हा वगळता अन्य कुठेही राष्ट्रवादीचे प्राबल्य नाही. बीड जिल्ह्यात राष्ट्रवादीचे चार आमदार आहेत, तर लातूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन आमदार आहेत. नांदेड व धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एकही आमदार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार व त्यांची साथ सोडून गेलेले अजित पवार यांच्या पदाधिकाऱ्यांत तसेच कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काम जवळपास शून्य आहे. तशीच परिस्थिती धाराशिव जिल्ह्यात आहे. मराठवाड्यात अन्य पक्षाचे नेते ज्याप्रमाणे दौरे करतात किंवा सभा घेत असतात तशी सभा किंवा दौरे राष्ट्रवादीच्या नेत्यांचे क्वचितच होत असतात. शरद पवार किंवा अजित पवार हे जेव्हा मराठवाड्याच्या दौऱ्यावर येतात त्यावेळेस त्यांचे कार्यकर्ते पोस्टर लावून त्यांचे स्वागत करण्यापलीकडे जनतेत कधीही मिसळत नाहीत; परंतु मराठवाड्यात असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडे तसेच पदाधिकाऱ्यांकडे शैक्षणिक संस्था व त्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. एवढी एकच ओळख राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची व मराठवाड्यातील नेत्यांची आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

मराठवाड्यात मात्र अजित पवार यांच्या गटातील कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतलेले संजय बनसोडे हे लातूर जिल्ह्यातील उदगीर येथून नेतृत्व करतात. त्यांना मंत्रिपद मिळाल्याने भविष्यात कदाचित हा भाग राष्ट्रवादीचा पट्टा म्हणून ओळखला जाऊ शकतो. तसे पाहिले तर शरद पवार व अजित पवार या दोन्ही नेत्यांच्या भांडणात भाजपचाच फायदा होईल असे दिसून येत आहे. मराठवाड्यातील परळी येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे हे अजित पवार यांच्या गटात आहेत. त्याचबरोबर लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील संजय बनसोडे यांना अजित पवार यांच्या गटात असल्यामुळे कॅबिनेट मंत्रीपद मिळालेले आहे. तसे पहिले तर हे दोन्हीही आमदार अजित पवार यांचे खूप पूर्वीपासून समर्थक आहेत. त्यामुळे मराठवाड्यात शरद पवार यांच्या तुलनेत अजित पवार यांचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे. हिंगोली जिल्ह्यातील वसमत विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांत नवघरे हे मात्र शरद पवार यांच्या गटाकडे झुकलेले दिसून येत आहेत. जालना जिल्ह्यातील घनसांगवी येथील राजेश टोपे यांचा मतदारसंघ हा दोन्ही नेत्यांकडे तेवढाच झुकलेला दिसून येत आहे. मराठवाड्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची पळवापळवी सुरू झाली असल्याने या पक्षाचे आठही जिल्ह्याचे अध्यक्ष बिथरले आहेत. कोणता झेंडा घेऊ हाती, असा प्रश्न या आठ जिल्हाध्यक्षांना पडला आहे. येत्या काही दिवसांत कोणता आमदार कोणाचा हे स्पष्ट होणार आहे. त्यानंतरच मराठवाड्यातील जिल्हाध्यक्षांनाही आपला नेता निवडता येणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रातच राजकारणाने एक वेगळीच दिशा घेतली आहे. त्यामुळे मराठवाड्यातही राजकीय पक्षांचे तसेच त्यांच्या नेत्यांचे आचार-विचार बदलत असल्याने राजकारणात वेगवेगळे चढ-उतार पाहावयास मिळणार आहेत.

**- मराठवाडा वार्तापत्र : अभयकुमार दांडगे**

# भंगणाऱ्या शब्दांच्या यमकांत न भंगणारे अभंग : 'भंग अभंग'

अहिराणी भाषेचे अभ्यासक डॉ. सुधीर राजाराम देवरे यांचे 'भंग अभंग' हे पुस्तक म्हणजे जीवनाचा वर्तमान काळ होय. एकूण चार काव्यसंग्रहांसह काही ग्रंथांची निर्मिती असलेले कवी, कथाकार, कादंबरीकार, संशोधक, समीक्षक, भाषा अभ्यासक, संपादक, मराठीतील सुप्रसिद्ध लेखक डॉ. सुधीर देवरे यांचे 'भंग अभंग' या पुस्तकाचे परीक्षण करताना विशेष आनंद होत आहे.




'भंग अभंग' या पुस्तकात कवीने नवनवीन शब्दांचा- घडवलेल्या शब्दांचा- बोलीभाषा- अहिराणी भाषा यांचा अप्रतिम असा वापर केलेला दिसून येतो. शब्दांचा खरा महिमा आणि शब्दांची जादू अनुभवायची असल्यास वाचकांनी 'भंग अभंग' अवश्य एकदा हातात घ्यावे. डॉ. देवरे यांच्या कविता म्हणजे एक प्रकारची समीक्षाच असते.

भंगू पाहणाऱ्या अभंगांना भंगू पाहणाऱ्या यमकांनी सजवून भंगणार नाहीत अशा चिरेबंद शब्दांकडून जीवन काव्यबद्ध करण्याचे कौशल्य 'भंग अभंग' या काव्यसंग्रहात दिसून येते. जसजसा समाज बदलत गेला तसतसे आचार- विचार बदलत गेले, जीवन जगण्याची रहाटी बदलत गेली. सत्य, सत्व, तत्व त्याचबरोबर साहित्याची रूपेही बदलत गेली. मात्र या विखुरलेल्या समाजातील परिवेश या समग्र कवितेत लोकसंस्कृतीसह उपयोजित झाला आहे. शारीरिक अवयवांसंबंधीचा मुक्तछंद वार्तालाप इथे होत राहतो. इंद्रियनिष्ठ अनुभव कथन करताना नैसर्गिक प्रामाणिक दृष्टीकोन दिसून येतो. लैंगिक जाणिवांच्या बाबतीत कवीच्या हातून अश्लील, धडक, अनैसर्गिक लेखन न होता मानवी जीवनाचा सहज नैसर्गिक भाग नैतिकता सांभाळून केलेले लेखन 'भंग अभंग' मध्ये पहावयास मिळते. 'देहात मैथुन', 'बोधी' या कवितांतून अनेक अर्थ प्रतित होतात. 'वस्त्र वाऱ्यावर' या कवितेतून तारुण्यातील स्त्रीच्या भावभावना तसेच तिच्या अल्लड वयाच्या स्तंभित करणाऱ्या व्यथा आणि समाजाच्या नजरा यांचा सुरेख संगम चित्रीत झाला आहे. कवितेतील अवघ्या काही शब्दांत खूप मोठे सत्य सहज सांगितले जाते. 'आशा' कवितेत मानवी मन प्रतिबिंबित होते, आशेपोटी मनुष्य भविष्यकाळात जगताना दिसतो, याचे सुंदर चित्रण येते. 'जिथं तिथं डोकं' या कवितेतून संसारिक भावभावनांचा मेळ, तर 'माझ्या घरा' या कवितेतून कवीने समाज मनाला एक आगळावेगळा संदेश मिळतो, आहे त्यात समाधानी असावे. समाधान हेच मनाचे खरे सुख आहे, अशा आशयाची ही कविता अर्थबोधित करते.

**......पुस्तक परीक्षण......**
**सचिन दि.अहिरे**
केरसाणे ता. बागलाण (नाशिक)
मो. ७७४४९९९९४४

'माणुसकी' या कवितेतून कवीने माणसांमधील भेदाचे वर्णन केलेले आहे. सर्वच माणसे जरी माणुसकीने वागत नसली, तरी माणसांमध्ये माणुसकी शिल्लक आहे आणि माणुसकी जपणारी माणसेही आहेत, अशा विरक्त आणि आशादायी भावना कवितेतून कवी मांडताना दिसतात. 'मूर्ती' कवितेतून चंद्रभागेजवळ वास्तव्य असणाऱ्या विठ्ठलाचा महिमा विठ्ठल भक्तांना उद्देशून व्यक्त होतो. 'पगार गोकुळ' या कवितेतून कवीने महिना अखेरीस मिळणाऱ्या व उदरनिर्वाहासाठी खर्च होणाऱ्या आणि त्यासाठी रात्रंदिवस कारकूनी करणाऱ्या वर्गाचे वर्णन केलेले दिसून येते. 'असो समाधानी' या कवितेतून कवीने शेअर मार्केटचे वर्णन केलेले असले तरी समाधानी राहण्याचे सूत्रही त्यात सांगितलेले आहे. कर्ज काढून जगणाऱ्या समाजाला एक नवा संदेश कवीने दिलेला आहे. 'आदिवासी कवी' या कवितेतून कवीने आदिवासी शब्दाची उकल केलेली असून साहित्यातला पहिला कवी हा आदिवासीच असल्याचे भान आणून दिले आहे. 'जोडलेला अर्थ' या कवितेतून कवीने कागदावर लिहिलेल्या पेनाच्या चुकांचा उल्लेख केलेला असला, तरी जीवन जगत असताना केलेल्या चुकांवर मनुष्य कसे पांघरूण घालत जातो याचा विचार करावयास भाग पाडणारी ही कविता आहे. म्हणून 'सावल्यांच्या आव्हानात' ही कविता पाहू :

**'इतकी पानं गळून गेली, झाड काही वठत नाही**
**एवढी धूळ उडून गेली , भुई काही झिजत नाही**
**आक्खा सूर्य गिळूनही , सृष्टी काही कण्हत नाही**
**सावल्यांच्या आव्हानात , सूर्य दिशा भुलत नाही.'**

या कवितेतून कवीने संकटांना सामोरे जाण्यासाठी अतिशय सुंदर शब्दांचा वापर केलेला दिसून येतो. आयुष्यात थोडे जरी संकट आले तरी माणसे डगमगून जातात. मात्र कितीही संकटे आली तरी खचून न जाता, घाबरून न जाता त्या आव्हानांना सामोरे गेले पाहिजे, अशा भावना कवी या कवितेतून व्यक्त करीत आहे. कवितेतून संदेश देताना कवी म्हणतात की, सूर्य मावळला म्हणून तो परत उगवणं विसरत नाही, झाडाची पाने कितीही गळली तरी नवीन पालवी फुटल्याशिवाय रहात नाही. प्रयत्न करीत राहणे ही किमया मानवाने निसर्गाकडून शिकावी असा बोध या कवितेतून होताना दिसतो.

'किती मोठी हौस', 'दोन दिशीच' या कवितांतून कवीने निसर्गाचे वर्णन केलेले दिसून येते. 'कानोसा' या कवितेतून कवीने कवीच्या मनातील भावना व्यतीत केलेल्या दिसून येतात. कविता म्हणजे हे एक प्रेमच आहे. 'आपल्या इतकं' या कवितेत कवीचा शब्दांमधला सहज भाव लक्षात येतो. 'टाळ्या' या कवितेतून सामाजिक संवेदना दर्शवताना कवी समाजातील विशिष्ट राजकारणी लोकांचा उल्लेख करताना म्हणतात की, भ्रष्टाचारी देखील स्वतःची वाहवा करून घेतात, तर 'हवाई ईस्टेट' या कवितेत कवी आजच्या समाजातील गरीब- श्रीमंत दरी दर्शवू इच्छितात.

'भंग अभंग' हे पुस्तक म्हणजे समकालीन जीवन जाणिवांची वास्तवता होय. मानवाने कितीही प्रगती केली तरीदेखील निसर्गापुढे तो अतिशय शुद्र आहे याची जाणीव कवीने वेळोवेळी करून दिलेली दिसून येते. मानवाने प्रगतीचा कळस गाठला असला तरी त्याला आता उलट्या दिशेने प्रवास करावा लागेल असे कवी म्हणतो. कवीने आपल्या कवितांमधून भविष्याचा वेध घेतलेला आहे. आनंद, दुःख, खेद, खंत, हर्ष, सुख, विलाप हे जीवनातील अविभाज्य भाग आहेत. मात्र जीवन जगत असताना आपण काय मिळवलं आणि काय गमावलं याचं चिंतन प्रत्येक मानवी मनाला होत असतं. अशाच आत्मनिष्ठ संवेदना मानवी भविष्याविषयी कवीने नमूद केलेल्या दिसून येतात. या देहात मन रमत नाही / देह उसना घेता येत नाही. या कवितेतून कवीने आपल्या मनाच्या अंतरीक भावना हृदयातून व्यक्त केलेल्या दिसून येतात.

डॉ. सुधीर देवरे यांच्या कवितेत अगदी सहजता असली तरी कवितेतील भावविश्व हे व्यापक आहे. बर्याचशा रचना अभंगात तर काही मद्दाम तोडलेल्या अभंगात- म्हणजे मुक्तछंदांत आहेत. संग्रहातील कवितांची विभागणी कवीने तीन भागात केलेली दिसून येते. भाग एक मध्ये 'भंगणारे अभंग'. यातील कविता अभंग रचनेतील वैचारिक कविता दिसून येतात. भाग दोन मध्ये 'भंगणारी यमकं' ही विविध विषयांशी निगडित मात्र व्यापक भावविश्वाचे आहेत. तर भाग तीन मध्ये 'भंगणारे शब्द' या मथळ्यातील कविता म्हणजे कवी मनातील भावोत्कट कल्पनाच. थोडक्यात, 'भंग अभंग' म्हणजे भंगणाऱ्या शब्दांच्या यमकांत न भंगणारे अभंग.

## शब्दकोडे-११९

आडवे शब्द

१. लढाईतील अस्त्र ४. बहुरूपी ७. जगण्याला गती देणारा पुरातन शोध ९. धंदा १०. विवाहितेचे घर १२. लक्ष्मीचे एक नाव १३. ढगांचा आवाज १६. ऐटबाट १८. मार्गक्रमण १९. सोन्याचांदीचा धागा २१. लौकिक जग २२. क्रीडा २३. शाहिरी गीत २५. दिवसाचा चोविसावा भाग २७. दणकट ३०. हाकेला उत्तर ३१. दारावरील खुणेचा आवाज ३२. पुष्कळ ३३. बेहोशीचा आणि अति जागरणचाही परिणाम ३६. विनोबाजींची समोकी गीता ३९. रोखलेली नजर ४०. फसविले जाणे ४२. होडी ४३. शरीरातील वात दूर करणारा ४५. सर ४७. लोखंड घासण्याचे हत्यार ४९. वेळ, मृत्यू ५०. तत्काळ, जागीच ५२. सामन्यातील पराक्रमी ५३. तंबूची कापडी भिंत ५४. तोरा, पत, अब्रू ५५. इंद्रिय ५६. उमटलेली प्रतिक्रिया ५८. पण करणे, अवघड काम तडीस नेण्याचा निश्चय करणे (वा.प्र.) ६१. वेदना, त्रास ६३. मरुत, वाहणारी हवा ६४. टोळीचा प्रमुख ६६. नकारच्या विरुद्ध ६८. धनी ७०. एक लहान गड्डा भाजी ७४. खराब ७६. रंग ७७. धातूचा धागा ७८. कलावंत ७९. प्रतिकूल परिणाम होणे, त्रास होणे

उभे शब्द

१. नसती उठाठेव करणारा २. पाण्यावरील हलकीशी लाट ३. खराब ४. नेहमी नशा करणारा ५. बांगड्यांचा व्यवसाय करणारा ६. फळातील द्रव ७. मोटार, बस इ. ८. जास्तीत जास्त ९. पंचामृतातील फळ ११. कणीदार १४. भित्रा १५. हातोहात, चपळाईने १७. बोलगाणे २०. आई २२. पादत्राण २४. हिरवा ताजा मसाला २६. फळांचे पेय २८. धागा तयार करण्याची प्रक्रिया २९. उदर ३१. प्रफुल्लित ३४. पालवीचा ऋतू ३५. औषधाची मात्रा ३७. चंद्र ३८. अजाणता ४०. तऱ्हतऱ्हेची फळे ४१. चाळणी अशी असते ४३. दिवस ४४. कप्पा, खण ४५. केशतेलातील सुगंधी वनस्पती ४६. जेमतेम ४८. कोरी ५१. बेडकांचे पर्जन्यगीत ५३. आच्छादन, आवरण ५४. विहीर ५६. पालव, साडीचा शेवटचा भाग ५७. करूणा, कीव ५८. उगीच ५९. खडा ६०. जलद व चपळाईने हालचाल करणे ६२. वृक्ष ६३. काळ्या तोंडाचे माकड ६४. मनाला लागलेली टोचणी ६५. यजमान, पती ६७. रहित ६९. कान ७१. वेल ७२. चंद्राची कड ७३. स्वर ७५. झाकणाचे पात्र



## शब्दकोडे ११८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.गोष्टीवेल्हाळ ४.जवळपास
७.उदबत्ती ९.तसा १०.सन
११.वधस्तंभ १२.नीर
१४.अवनती १५.सान
१६.यशवंत १८.यमराज
२०.काळा २१.नाच २२.तर
२३.फसगत २५.समरस
२७.पायजमा २९.वडील
३१.नारद ३२.बनकर ३३.वरात
३५.वीररस ३६.हवालदार
३९.सनगर ४१.दादला ४२.मम
४४.टवकारणे ४६.वरताण ४७.मकान ४९.दाखल होणे ५१.सामना ५२.कडोसार ५३.कमतरता
५६.सावळा ५७.समरभूमी
५८.याक ५९.पहा ६०.कवडसा
६२.जागर ६५.सुतार ६७.हेडमास्तर ६९.अंगराज ७०.धावणे
७१.रडार ७२.मधुकर

**उभे उत्तर**

१.गोपनीय २.वेत ३.ल्हासा
४.जनननमास ५.पावसाळा
६.सधन ७.उभयचर ८.बळवंत
१०.सव १३.रमणीय १७.तरतूद
१९.जनमानस २०.कातडी
२१.नामदेव २३.फकीर
२४.गवगवा २६.सनातन
२७.पालवी फुटणे २८.जबर
३०.लगदा ३४.रास ३६.हलाहल
३७.लपवणे ३८.रमताराम
४०.रतन ४१.दाणेदार ४३.मण
४५.कानाडोळा करणे ४७.ममता
४८.काना ५०.होकार ५१.सारक
५२.कव ५३.कमीजास्त
५४.तयार ५५.महाराज
५६.साधासुधा ५७.ससा
६१.डबर ६३.गरम ६४.घागर
६६.ताव ६७.हेर ६८.मात्र
६९.अंक

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# वेदमंत्राच्या जयघोषात राष्ट्रीय वेदशास्त्र महापरिषदेचे उद्धघाटन

**नाशिक । प्रतिनिधी**

वेदांमध्ये सर्व प्राणीमात्रांच्या जीवांचे कल्याण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यामुळे अतिप्राचीन वेदांची संरक्षण करण्याची जबाबदारी सर्व समाजाची आहे. भारतीय संस्कृती आणि जीवन संस्कारांचे दर्शन वेदांमध्ये घडते. संपूर्ण ज्ञानाची व जीवनाची सारतत्वे वेदात सामावलेली आहेत, संपूर्ण जगाच्या कल्याणाची शक्ती वेदांमध्ये असून ते अपौरुषेय म्हणजे मानवनिर्मित नव्हे तर ईश्वर रचित आहेत. विश्वकल्याणाची ताकद मंत्रशक्ती व वेदांतात आहे. पर्यावरण व निसर्ग संतुलनासाठी वेद ब्रम्हांडाचा विचार करतात असे प्रतिपादन कुलगुरु प्रो. डॉ. हरेराम त्रिपाठी यांनी केले.

येथील महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान, दक्षिणाम्नाय श्री श्री जगद्गुरु शंकराचार्य महासंस्थान शृंगेरी, कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेक व जनसंज्ञापन विभाग ऑरो विश्वविद्यालय (सुरत ) यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिकमध्ये राष्ट्रीय वेदशास्त्र महापरिषदेचे वेदमंत्राच्या जयघोषात व धार्मिक वातावरणात उद्धघाटन संपन्न झाले. पंचवटीत सरदार चौकातील गोपाल मंगल कार्यालयात काल (दि.१३) जुलै रोजी दुपारी महापरिषदेला प्रारंभ झाला. महापरिषदेचे उद्धाटन रामटेकच्या कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरू प्रो. डॉ. हरे राम त्रिपाठी यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर वेदशास्त्र संपन्न गणेशशात्री द्रविड, वेदांतरत्न प्रमोदशास्त्री कुलकर्णी, प्रतिष्ठानचे सचिव व प्रधानाचार्य वेदाचार्य रवींद्र पैठणे, जनसंज्ञापन विभाग ऑरो विश्वविद्यालय व ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर, महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त पं. दत्तात्रय पैठणे, भाजपचे सरचिटणीस लक्ष्मण सावजी आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना कविकुलगुरू कालिदास संस्कृत संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरू प्रो. हरेराम त्रिपाठी म्हणाले की, वेदांची परंपरा जाणून ऋषीमुनींनी त्याचा अभ्यास केला. अलीकडच्या काळात स्वामी विवेकानंद स्वामी, महर्षी दयानंद सरस्वती, लोकमान्य टिळक यासारख्या महापुरुषांनी वेदशास्त्राचा अभ्यास केला असेही त्यांनी सांगितले. यावेळी पंडितराज वेदशास्त्र संपन्न गणेशशास्त्री द्रविड गुरूजी यांनीही वेदाचे महत्त्व स्पष्ट केले. वेदाच्या संरक्षणासाठी अन्य वाङ्मय निर्माण झाले आहे, असे शास्त्री म्हणाले मुलतः धर्माचे ज्ञान वेदातून होते, परमेश्वराचे ज्ञानही वेदातून आपल्याला होते असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी चारही वेदांच्या मंत्रांचे पठण करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. संयोजकांच्यावतीने मान्यवरांचा व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. निमंत्रक रवींद्र पैठणे यांनी प्रास्ताविकत पाठशाळेची माहिती देऊन विविध उपक्रमांचा आढावा घेतला. विश्वास देवकर यांनी मानवतेच्या कल्याणाचा महापरिषदेचा संकल्प असल्याचे सांगून समाजाच्या उन्नतीसाठी व युवापिढीला वेदपरंपरेशी जोडण्यासाठी एक अभ्यासक्रम आखण्याचा प्रस्ताव सादर केला. त्यानंतर वैदिक संहिता, जन संज्ञापन व संतांची वेदनिष्ठा या विषयावर परिसंवाद झाला. त्यामध्ये प्रा. हरेराम त्रिपाठी, वेदशास्त्र संपन्न गणेशशास्त्री द्रविड, वेदांतरत्न प्रमोदशास्त्री कुलकर्णी, स्मार्त चुडामणी शांताराम भानोसे सहभागी झाले. ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर परिसंवादाचे संचालन केले.



**आज सन्मान सोहळा**

**गंगापूररोडवरील शंकराचार्य न्यासाच्या डॉ.कूर्तकोटी सभागृहात वेदशास्त्र संस्कृत पुरस्कार प्रदान सोहळा होईल.आज (दि.१४) रोजी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या पुरस्कार वितरण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून दिल्लीच्या केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु डॉ. श्रीनिवास वरखेडी उपस्थित रहाणार आहेत. त्यांच्या शुभहस्ते सन्मान वितरित होणार आहेत. कै.भास्कर अण्णा जोशी स्मरणार्थ राष्ट्रीय वेदशास्त्र शिरोमणी पुरस्कार वाराणसीचे गणेश्वरशास्त्री द्रविड यांना प्रदान करण्यात येणार आहे. धर्मभूषण गौरीशंकर राष्ट्रीय ऋग्वेद पुरस्कार चेन्नईचे हरीहरन घनपाठी यांना, नाशिकचे वेदाचार्य शांताराम भानोसे यांना यजुर्वेदासाठी, तर सामवेद पुरस्कार बंगळुरुचे मानस मिश्रा यांना व अथर्ववेद पुरस्कार जालन्याचे दिनकर जोशी यांना प्रदान करण्यात येतील. संस्कृत सेवाव्रती राष्ट्रीय पुरस्कार रामटेकचे मधुसूदन पेंना, नाशिकच्या वैशाली वैद्य यांना जाहीर झाले आहेत.**

# नशामुक्त भारत अभियान ब्रम्हा व्हॅली कॉलेज त्र्यंबकेश्वरला उत्साहात

**नाशिक । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल जिल्हा परिषद नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नाशिक यांच्या मार्फत ब्रह्मा व्हॅली कॅम्पस त्र्यंबकेश्वर येथे अनुक्रमे सहायक आयुक्त समाज कल्याण नाशिक, जिल्हा जात पडताळणी समिती नाशिक व बार्टी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती राजश्री शाहू महाराज जयंती पर्व निमित्ताने व नशामुक्त भारत अभियान अंतर्गत राजेंद्र पवार यांचे व्यसन, त्याचे दुष्परिणाम व व्यसनमुक्ती या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी व्यसनमुक्त समाज निर्मिती व विद्यार्थी दशेत चांगल्या सवयी जोपासणे किती आवश्यक आहे याबाबत योगेश पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांनी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणे देवून समजावून सांगितले.

व्यसनमुक्ती पंधरवडा दरम्यान नशामुक्त भारत अभियान या विषयावर आयोजित पोस्टर स्पर्धेचे विजेते यांना प्रशस्ती प्रमाणपत्र व रोख बक्षीस देवून गौरविण्यात आले. कार्यक्रम दरम्यान जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग मार्फत राबविण्यात येत असलेला जात प्रमाणपत्र संदर्भातील मंडणगड पॅटर्न, जिल्हा जात पडताळणी समिती नाशिक यांच्या मार्फत जातप्रमाणपत्र पडताळणी मोहीम, समाज कल्याण विंभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती देण्यात आली. व्यसनमुक्तीची शपथ घेवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

याप्रसंगी योगेश पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद नाशिक, हर्षदा बडगुजर विशेष अधिकारी सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय नाशिक, मनीषा गांगुर्डे वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक, सावकार वरिष्ठ लिपिक, प्रतिज्ञा दाभाडे व सुजाता वाघमारे बार्ती, ब्रह्मावली कॅम्पस डायरेक्टर डॉ.सी.के.पाटील, जुनियर कॉलेज प्राचार्य चंद्रकांत शिरसाठ, अभियांत्रिकी कॉलेज प्राचार्य हरिभाऊ कुदळ, प्राथ.विभागाचे संचालक व प्राचार्य विजय तांबे, मुख्याध्यापक आर.जी.विद्यालय त्र्यंबकेश्वर दिलीप ह्यालिज हे उपस्थित होते. ईशी निधी यांनी सूत्रसंचालन केले.

# ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केल्यास यश मिळते : सपकाळे

**नाशिक । प्रतिनिधी**

प्रत्येकाने आपल्या जीवनात ध्येय नक्की केले पाहिजे. ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केल्यास यश नक्की मिळते असे प्रतिपादन पंचवटी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे यांनी केले. सी.डी.ओ. मेरी हायस्कूल मधील शालांत परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ संपन्न झाला. समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सपकाळे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे अध्यक्ष पांडुरंग अकोलकर होते. यावेळी व्यासपीठावर सी.डी. ओ. मेरीचे उपअभियंता एस.टी. खेडकर, वाय.टी.बैसाणे, संस्थेच्या शिक्षक मंडळाचे अध्यक्ष दिलीप अहिरे, मुख्याध्यापक राजेंद्र कापसे, उपमुख्याध्यापक रवींद्र हत्ते, पर्यवेक्षिका सुरेखा सोनवणे, पालक शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष जयश्री काशीकर,दिशा बेंडाळे, अमित शिंदे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पालक शिक्षक संघाचे कार्यवाहक कैलास पाटील, राजेंद्र पारधी, कविता खोटरे, पंढरीनाथ बिरारी, प्रज्ञा महाजन, अनिल पवार, पुंडलिक शेंडे, तुषार पवार, संगीता सोनार, छाया गुंजाळ आदींसह इयत्ता दहावीच्या वर्गाला मार्गदर्शन करणारे शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

**ॲड. एम.बी.जैन**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ४ थे सह दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. ८२२/२०२३**

१) श्रीमती आचल आदित्य शाह
२) कु. सावनी आदित्य शाह
३) कु. सुहानी आदित्य शाह
४) श्री किशोर रतनचंद शाह ......अर्जदार
।। आणि ।।
कै. आदित्य किशोर शाह ...... मयत

ज्या अर्थी अर्जदार यांनी वर नमुद मयताचे कायेदशिर वारस या नात्याने शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महसुल कार्यालय यांचेकडील व त्याअनुशंगाने कामकाजासाठी व मयताच्या वारसासंबंधीच्या आवश्यक बाबींच्या पुर्ततेसाठी अर्जदारांचे नावाने हेअरशिप सर्टिफिकेट मिळावे म्हणुन अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी वर नमुद केलेल्यानुसार मयतांच्या वारसाबाबत हेअरशिप सर्टिफिकेट अर्जदार यांचे नावे देण्यास कोणाचीही कोणताही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी दि. २१/०८/२०२३ रोजी १० वाजता वर निर्दिष्ट केलेल्या कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहून मांडाव्यात अन्यथा अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

आदेशावरून

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर,धुळे** **दिवाणी न्यायालय क.स्तर,धुळे**

# भाऊसाहेब पाटणकर यांची गझल कालातीत : परांजपे

**नाशिक । प्रतिनिधी**

भाऊसाहेब पाटणकर यांच्या गझलांमध्ये तत्वचिंतनाची बैठक दिसून येते. त्यांनी आपल्या गझलांमधून आशयाचा, समृद्ध भाषेचा वापर केलेला दिसतो. भाऊसाहेब यांना तत्वविचारांचे आणि ते मांडण्याचे कौशल्य साधले होते. दृष्टी गेल्यानंतर त्यांच्या जीवनात आलेल्या अंध:कारातून गतकाळाच्या स्मृतींमध्ये रमल्यानंतर त्यांना काव्य स्फुरत गेले आणि त्यांची काव्यप्रतिभा बहरून आली. ५ दशकांपूर्वी विपुल भन्नाट, अफलातून विषय त्यांनी गझल, रुबाईमध्ये मांडले. आजही त्यांची गझल तेव्हढीच ताजी व कालातीत आहे. म्हणून मनाला भिडते असे प्रतिपादन शेखर परांजपे यांनी केले.



लोकहितवादी मंडळाच्या वतीने मराठीतील आद्य गझलकार भाऊसाहेब पाटणकर यांच्या मराठी गझलांवर आधारित एक बहारदार मैफल नुकतीच व्यवसायाने इंजिनिअर व शैक्षणिक क्षेत्रात योगदान असलेल्या शेखर परांजपे यांनी सादरीकरण करून भाऊसाहेबांच्या अनेक रचना श्रोत्यांना ऐकवल्या. प्रेम, आनंद, विनोद या बरोबरच वार्धक्य, मृत्यू हे विषय देखील त्यांनी तेव्हढयाच कुशलतेने हाताळले असे त्यांनी विविध गझल सादर करून स्पष्ट केले.

या गझल प्रमाणे ५२ पत्यांवर आधारित रचनेलाही उपस्थितांचा प्रतिसाद मिळाला. मंडळाचे अध्यक्ष मुकुंद कुलकर्णी यांनी स्वागत केले. प्रा.डॉ. प्रशांत पाटील यांनी परिचय करून दिला. सतीश मोहोळे यांनी आभार मानले. पेठे हायस्कुलचे मुख्याध्यापक कैलास पाटील, जयप्रकाश जातेगांवकर, संजय देवधर, ड. नंदकिशोर भूतडा, विश्वास मदाने, राजा पाटेकर यांच्यासह रसिक श्रोते उपस्थित होते.

## जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री. जितेंद्र दयानंद तनेजा, रा. त्र्यंबक बुवाजीची चाळ, साक्री, जि. धुळे यांनी त्यांच्या मालकीचे मौजे साक्री, ता. जि. धुळे येथील गट/ सर्व्हे नं. १४० /१ पैकी प्लॉट नं. १४ चे क्षेत्र २१० चौ.मी. येणे प्रमाणे मिळकतीस अनुषंगुन एच.डी.एफ.सी. लि., शाखा देवपुर, धुळे यांचेकडे गृह कर्ज मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे मालमत्तेचे जितेंद्र दयानंद तनेजा यांचे खरेदीपुर्वी झालेले मालकी हस्तांतरणा बाबतचे रजि. खरेदीखत १ ) मा. दुय्यम निबंधक सो. साक्री, जि. धुळे यांचे कडील दिनांक २९/१०/१९९६ रोजीचे रजि. खरेदीखत दस्त क्रं. १३१३ / १९९६ (दिलीप मुलचंद गौंड यांनी १) दिलीप देविचंद जैन २) सौ. किरण दिलीप चोपडा यांच्याकडून खरेदी केलेले ) २. मा. दुय्यम निबंधक सो., साक्री, जि. धुळे यांचे कडील दिनांक २८/०८/२००६ रोजीचे रजि. खरेदीखत दस्त क्रं. २६७४ / २००६ (जितेंद्र भटूलाल जैन यांनी दिलीप मुलचंद गौड यांच्याकडून खरेदी केलेले ) ३. मा. दुय्यम निबंधक सो. साक्री, जि. धुळे यांचे कडील दिनांक २४/०१/२००८ रोजीचे रजि. खरेदीखत दस्त कं . २६४ / २००८ मधील गहाळ पान क्रं. ६ व ७ (जितेंद्र दयानंद तनेजा यांनी जितेंद्र भटूलाल जैन यांच्याकडून खरेदी केलेले).

येणे प्रमाणे मुळ दस्त हे माझे पक्षकार घेत असलेल्या गृह कर्जा बाबत लिंक दस्ताऐवज असुन सदरचे दस्ताऐवज कोणासही मिळाली असल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये तसेच सदरचे खरेदीखत किंवा त्याची मुळ पावती कोणत्याही संस्थेकडे, बॅन्केकडे किंवा इतर कोणाहीकडे तारण गहाण / नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा हितसंबंध असल्यास किंवा कोणालाही मिळून आल्यास किंवा कोणाचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रांसह खालील पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ ( सात ) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन भेट घ्यावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकत / नोटीस आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच मुदतीनंतर कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे :
दिनांक : १३/०७/२०२३

**ॲड. विजय म. मोरे**
ऑफिस - बी/१२, भन्साली प्लॉझा,
नगरपट्टी, धुळे.

## जाहिर नोटीस टायटल व्हेरिफिकेशन

तमाम लोकांस व जनतेस सदर जाहिर नोटीसी मार्फत कळविण्यात येते की, मौजे देवपुर, ता. जि.धुळे, सि.टी. एस. नं. ७३९६ (स.नं.५७+५८ प्लॉट नं. १५) क्षेत्र २४७. ५० चौ.मी. जूनी बांधीव मिळकत देवपुर, ता.जि. धुळे येथील प्लॉट धारक व मालक श्री. जगदिश पांडुरंग सगरे रा.१५, विद्या नगर, देवपूर, धुळे यांचे वरील स्थावर मिळकत वडीलोपार्जित मिळकत आहे. कै. पांडुरंग महादु सगरे यांनी रजि. खरेदीखत दस्त नं. १९७४, दि. १२/०६/१९७४ रोजी वरील मिळकत खरेदी केली होती. सदर खरेदीखताचा दस्त गहाळ झाला असुन मुळ दस्त आढळून येत नाही. या मिळकतीवर कोणतेही कर्ज अथवा बोजा नाही.

तरी सदर खरेदीखत गहाळ झाल्याने सदरची जाहिर नोटिस देण्यात येत आहे. स्थावर मिळकत धारकास राष्ट्रियकृत बँकेकडुन गृह बांधनीसाठी कर्ज घ्यावयाचे असल्याने सदरची जाहिर नोटिस दिली असे. आमच्या अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरून तमाम लोकांना तसेच बँका, सहकारी संस्था, इतर वित्तीय संस्था व सावकार, शासकिय, निमशासकिय, स्वायत्त संस्था, प्रोप्रायटरी फर्म, कंपनी वैगरे सर्वांना या जाहिर नोटिसीव्दारे कळविण्यात येते की, प्लॉट मालक श्री. जगदिश पांडुरंग सगरे यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या व ताबे उपभोगातील खालील प्रमाणे वर्णन असलेल्या मिळकतीच्या मालकी हक्काबाबत. मिळकतींचे वर्णन : मौजे देवपुर, ता. जि. धुळे, सि. टी. एस. नं. ७३९६ (स.नं. ५७+५८ प्लॉट नं. १५) क्षेत्र २४७. ५० चौ. मी. जूनी बांधीव मिळकत देवपुर, ता. जि. धुळ त्यांसी चतु:सिमा -

पूर्वेस - प्लॉट नं. १६, दक्षिणेस - रस्ता,
पश्चिमेस - प्लॉट नं. १४ उत्तरेस - प्लॉट नं. ५

सबब तमाम लोकांना या जाहिर नोटिसीव्दारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह एड लायसन्स, भाडेपट्टा, वारसहक्क, मुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी-विक्री, कुळ अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी सदरची नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत ॲड. पराग एस. खानकरी रा. 'श्रीमंगलम्', चितळे हॉस्पिटल जवळ, वाणी कॉलनी, देवपूर, धुळे या पत्त्यावर पुराव्यानिशी घेतलेल्या हरकती नोंदवाव्यात. ७ दिवसानंतर आलेल्या हरकती व पुराव्यानिशी घेतलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत व परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीचा मालकी हक्क व खरेदीखत संबंधी कोणाचेही काही एक हरकत नाही व सदर मिळकत निंबोज व हस्तांतरणीय आहे असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा बँकेसोबत कर्ज व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

धुळे,
दिनांक - १३/०७/२०२३

**ॲड. पराग एस. खानकरी**
'श्री मंगलम्' चितळे हॉस्पिटल जवळ,
वाणी कॉलनी, देवपूर, धुळे.

**ॲड. संदीप अर्जुन गर्दे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर सो. यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र.८२७/२०२३**

१) सायराबी अहिनुद्दिन पिंजारी ..........अर्जदार
वि.
निरंक .........जाबदेणार
कै./ज. अहिनुद्दिन फकिरा पिंजारी .........मयत
(मृत्यु दि. २६/०९/२०२० रोजी मयत )

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र. ८ सोा. धुळे यांचेकडे दि.७/७/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि.दि.अर्ज क्र.८२७/२०२३ चा अर्ज कै./ज. अहिनुद्दिन फकिरा पिंजारी यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे. न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि. १८/८/२०२३ हि निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधिताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे ८ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कोर्ट नं. ८ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारीखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि. ११/०७ / २०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,धुळे** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर,धुळे**

**प्रोसेस जमा** **ॲड.तुकाराम एन.मासुळ**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. ७७७/२०२३**

१) रमेश धर्मा थोरात,
वय - ५२ धंदा - शेती
रा. १९६, इच्छापुर (सैयदनगर),
तालुका - साक्री, जिल्हा - धुळे
२) नाना धर्मा थोरात, (मयत)
२.१ तापाबाई नाना थोरात,
वय - ६९ धंदा-घरकाम
२.२ दगा नाना थोरात,
वय-४३, धंदा-शेती
२.३ भिमराव नाना थोरात,
वय- ३३, धंदा - शेती,
२.१ ते २.४ सर्व रा. १९६, इच्छापुर, (सैयदनगर),
तालुका - साक्री, जिल्हा - धुळे
२.४ वैशाली गोरख मारनर,
वय - ३४, धंदा - घरकाम,
रा. ११९, हटकरवाडी, चितोडरोड, धुळे
३) येसाबाई लक्ष्मण गोयकर,
वय - ६५ धंदा घरकाम,
रा. नवागांव, तालुका - साक्री, जिल्हा - धुळे
४) वेणुबाई सखाराम मारनर,
वय - ५२, धंदा - घरकाम,
रा. इच्छापुर, पो. वसमार,तालुका - साक्री, जिल्हा - धुळे
....... अर्जदार

विरुध्द
कुणीही नाही ....... सामनेवाला
कै. धर्मा दशरथ थोरात (ठेलारी) ...... (मयत)
कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी
Legal Heirship Certificate

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. धर्मा दशस्थ थोरात (ठेलारी) यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ८ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (कनिष्ठ स्तर) कोर्ट नं. यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. २५/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. १ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. धर्मा दशरथ थोरात (ठेलारी) यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि.०५/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकुन** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर,धुळे** **दिवाणी न्यायालय क.स्तर,धुळे**

## न्यूज कॉलम

### प्रमोद पाटील यांची उपशिक्षणाधिकारीपदी नियुक्ती

**धुळे ।** जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात उपशिक्षणाधिकारीपदी प्रमोद पाटील यांच्या नियुक्ती करण्यात आली. नंदुरबार जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात वेतन अधीक्षकपदाचा कार्यभार सांभाळत होते. श्री. पाटील यांनी याअगोदर धुळे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागात वेतन अधीक्षक व कार्यालयीन अधीक्षक म्हणून काही वर्षे काम केले आहे. त्यामुळे त्यांना धुळे माध्यमिक शिक्षण विभागात काम करण्याचा अनुभव पाठीशी आहे, तसेच त्यांना धुळे जिल्ह्यातील शिक्षकांचे प्रश्न जाणून आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे शैक्षणिक प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे.

### तरुणास मारहाण; एकाविरुद्ध गुन्हा

**शिरपूर ।** उधार घेतलेले पैसे परत का दिले नाही, असे म्हणत शहरातील साक्री रोडवरील यश वंतनगरात एका तरुणास ठार ठार करण्याची धमकी दिली. तसेच त्याच्या मानेवर लोखंडी वस्तूने मारून जखमी केले. सोमवारी (ता. ११) दुपारी तीनच्या सुमारास ही घटना घडली. गणेश संतोष दोरकर (रा. यशवंतनगर, साक्री रोड, धुळे) याच्या फिर्यादीनुसार ११ जुलैला भटू नाना श्रीखंडे (रा. यशवंतन-गर) याने 'तुला मयूर घुले याचे पैसे द्यायला सांगितले होते, तू अजून का दिले नाही' म्हणत त्याच्या हातातील लोखंडी वस्तूने जखमी केले. तसेच शिवीगाळ करीत ठार करण्याची धमकी दिली.

# १९ लाखांचा विदेशी मद्यसाठा जप्त

## तिघांविरुद्ध गुन्हा, दोघांना अटक, शहर पोलीसांची धडक कारवाई

**नंदुरबार । प्रतिनिधी**

नंदुरबार शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने जगताप वाडी परिसरात एका वाहनातून वाहतूक होत असलेल्या १८ लाख ७० रुपये किमतीच्या दारूसह एकुण ४५ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याबाबत वाहन चालकासह मालक व सहचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहचालक फरार झाला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, दि.१२ जुलै २०२३ रोजी पोलीस अधीक्षक पी.आर.पाटील यांना एक पिकअप व एक इनोव्हा या वाहनांमधुन नंदुरबार शहरातील जगतापवाडी परिसरात अवैध दारू घेवून येणार आहे अशी गुप्त बातमी मिळाली. त्यानुसार शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांना कारवाईचे आदेश दिले. श्री.कळमकर यांनी दोन वेगवेगळ्या पथकासह जगतापवाडी परिसरात रोडवर सापळा रचला. रस्त्याने येणार्या जाणार्या वाहनांची बारकाईने तपासणी करीत असतांना सकाळी ४.३० वाजेच्या सुमारास एक चारचाकी मोठे वाहन व त्याच्या पाठीमागे एक इनोव्हा वाहन भरधाव वेगाने येतांना दिसले.

पथकाने टॉर्चच्या सहाय्याने वाहन उभे करण्याचा इशारा दिला. मात्र चालकाने वाहन भरधाव वेगाने पुढे नेले. पथकाने वाहनाचा पाठलाग केला. परंतु चालकाने काही अंतरावर वाहन उभे करून सोडून पळ काढला. तरीही पथकाने पाठलाग करुन शिताफीने चालकाला ताब्यात घेतले. शिवाजी बाबुलाल चौधरी (वय २९, रा.पडावद ता.शिंदखेडा जि.धुळे ह.मु. जगतापवाडी नंदुरबार) असे त्याचे नाव असून त्याचा साथीदार पळून गेला. महिंद्रा पिकअप वाहन (क्रमांक एमएच-३९ सी-७३०६) ची तपासणी केली असता त्यात १४ लाख ४० हजार ७६८ रूपये किंमतीचे २५६ खाकी रंगाच्या पृष्ठाचे बॉक्स होते. त्यावर माल्ट व्हीस्की असे इंग्रजीत लिहिलेले होते. प्रत्येक बॉक्समध्ये रॉयल ब्ल्यू माल्ट व्हीस्की १८० मिली असे लेबल असेलेले प्लास्टीकच्या सिलबंद बाटल्या एकुण ४८ नग होत्या.

त्याचप्रमाणे एकुण १२ पॉलीथिन थैली प्रत्येकी थैली एकुण ४८ नग नमुद वर्णनाच्या व्हिस्कीच्या बाटल्या अश्या एकुण १२ हजार ८६४ नग बाटल्या प्रत्येकी बाटलीची किंमत ११२ रुपये आढळून आली. ६ लाख रुपये किमतीचे महिंद्रा पिकअप वाहन (क्रमांक एमएच३९-सी-७३०६) असा एकुण २० लाख ४० हजार ७६८ रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर मुद्देमाल, पिकअप वाहन ही पोलीसांनी कायदेशीर प्रक्रीया करून ताब्यात घेतले. सदर दारू कोणाची आहे असे ताब्यात घेण्यात आलेल्या इसमास विचारणा केली असता, त्याने सदरचा माल हा जगतापवाडी मध्ये राहणारा मुकेश अर्जुन चौधरी याचा असल्याचे सांगीतले. मुकेश चौधरी यालादेखील जगताप वाडी येथून ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी त्याच्या घरासमोर उभी असलेली टोयोटा कंपनीची इनोव्हा क्रिस्टा पांढर्या रंगाची (क्रमांक एमएच-४३- व्ही-६३५४) वाहनाबाबत विचारले असता सदर गाडी ही त्याचीच असल्याचे सांगीतले. तिची तपासणी केली असता त्यात ४ लाख ३० हजार ८० रूपये किंमतीचे एकुण ८० खाकी रंगाचे पृष्ठाचे बॉक्स, त्यावर माल्ट व्हीस्की असे इंग्रजीत लिहिलेले बॉक्स होते. त्यात प्रत्येकी बॉक्स मध्ये ठरॉयल ब्ल्यू माल्ट व्हीस्की १८० मिली असे लेबल असेलेले प्लॉस्टीकच्या सिलबंद बाटल्या एकुण ४८ नग मिळूनप आल्या. व्हिस्कीच्या बाटल्या अश्या एकुण सर्व ३ हजार ८४० नग बाटल्या प्रत्येकी बाटलीची किंमत ११२ रुपये, २१ लाख रुपये किमतीचे टोयोटा कंपनीचे इनोव्हा (क्रमाकं एमएच-४३-व्ही-६३५४) असा एकुण २५ लाख ३० हजार ८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेल्या दोन्ही इसमांच्या वाहनातून एकुण १८ लाख ७० हजार रुपये किमतीची अवैध विदेशी दारु व २७ लाख रुपये किमतीचे दोन चारचाकी वाहने असा एकुण ४५ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल कायदेशीर प्रक्रिया करुन जप्त करुन ताब्यात घेण्यात आला. या दोघांसह पळुन गेलेल्या एका इसमाविरुध्द् नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६०१/२०२३ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), १०८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक पी.आर. पाटील, अपर पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उप विभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर, सहा. पोलीस निरीक्षक चंद्रकांत पाटील, पोलीस उप निरीक्षक विकास गुंजाळ, पोलीस हवालदार जगदीश पवार, राजेश येलवे, दिपक गोरे, पोलीस नाईक भटु धनगर, बलविंद्र ईशी, स्वप्नील पगारे, नरेंद्र चौधरी, पोलीस अंमलदार किरण मोरे, इम्राण खाटीक, राहुल पांढारकर, अनिल बडे, युवराज राठोड यांच्या पथकाने केली.

# पोटातून ६ किलो वजनाचा गोळा काढण्यात डॉ. सुप्रिया कुलकर्णींना यश

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे चॅरीटेबल सोसायटीचे शतायू हॉस्पिटल येथे पोटाच्या शस्त्रक्रियेत सहा किलो वजनाची अंडाशयाची गाठ काढण्यासाठी स्त्री रोग तज्ञ डॉ सुप्रिया कुलकर्णी सह त्यांच्या टीमला मोठे यश आले आहे.

शहरातील हजार खोली परिसरात राहणारी महिलेला गेल्या ३ वर्षांपासून पोटात त्रास होत होता परंतु परिस्थिती हलाखीची असल्याने गोळ्या/औषधे घेऊन तात्पुरता इलाज करून घेत होती. नवीनच सुरू झालेल्या शतायू हॉस्पिटलमध्ये १ जुलै २०२३ रोजी महाआरोग्य शिबीर घेण्यात आले होते, त्यादरम्यान डॉ. कुलकर्णी यांनी या महिलेची तपासणी केली आणि पोटाचा उढ स्कॅन करणेसाठी सांगितले. महिलेची परिस्थितीचा विचार करून सर्व डॉक्टरांनी ही शस्त्रक्रिया कमीत कमी खर्चात बचत करून कशी करता येईल याचा प्रयत्न करून ही शस्त्रक्रिया डॉ. सुप्रिया कुलकर्णी, डॉ. सुमन भालानी, डॉ. प्रशांत रानडे ( भूलतज्ञ) राहील शेख यांनी यशस्वीपणे केली. पेशंटच्या नातेवाईकांनी शतायू हॉस्पिटल च्या सर्व डॉक्टर टीम व स्टाफ चे अल्पदरात शस्त्रक्रिया केल्या बद्दल आभार मानले आहे.

# अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे, खते खरेदी करावीत : कृषि आयुक्त सुनील चव्हाण

**धुळे । प्रतिनिधी**

चालू खरीप हंगामातील पेरणीच्या अनुषंगाने राज्यात १६ लाख ८२ हजार २४५ क्विंटल म्हणजे ८७ टक्के बियाण्याचा पुरवठा झाला असून शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे व खते खरेदी करावीत, असे आवाहन राज्याचे कृषि आयुक्त सुनील चव्हाण यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

राज्याचे सरासरी पर्जन्यमान ३१४.३ मिमी असून १ जून ते १० जुलै या कालावधीत आत्तापर्यंत २२७.३ मिमी एवढा पाऊस झाला आहे. खरीप हंगामासाठी ४६.७ मे. टन खतांचा साठा उपलब्ध आहे. त्यापैकी १८.९५ लाख मे.टन खतांची विक्री केली असून राज्यात २७.१२ लाख मे.टन खतांचा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आवश्यकतेनुसार खतांची खरेदी करावी. सद्यस्थितीत कापूस, सोयाबीन व तूर व इतर पिकांच्या पेरण्या तसेच भात रोपवाटिकेची कामे सुरु आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पाऊस पडल्यास आठवड्यात पेरणीच्या कामाला वेग येईल.

राज्यात पुरेसे खते व बियाणे उपलब्ध असून फसवणूक होऊ नये म्हणून शेतकऱ्यांनी खरेदीची पावती व टॅग जपून ठेवावेत. कृषिविषयक योजनांच्या माहितीसाठी व तक्रारींचे निवारण करण्यासाठी १८००२३३४००० या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहनही कृषि विभागातर्फे करण्यात आले आहे.

# नगर अभियंता माधवराव पाटील यांचे कार्य उल्लेखनीय

### आमदार अमरिशभाई पटेल यांचे गौरवोद्गार

**शिरपूर । प्रतिनिधी**

शिरपूर वरवाडे नगर परिषदेत नगर अभियंता माधवराव पाटील यांचे कार्य उल्लेखनीय राहिले. शिरपूर शहर म्हणजे आमचा आत्मा आहे. शहराच्या विकासासाठी जे नियोजन केले, त्याची अंमलबजावणी तंत्रकुशल सहकाऱ्यांमुळे होऊ शकली. पालिकेला चांगल्या अधिकाऱ्यांची परंपरा असल्यामुळे राज्यभरात शिरपूर शहर प्रथम स्थानावर आणणे शक्य झाले असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी केले.



शिरपूर वरवाडे नगरपरिषद नगर अभियंता माधवराव पाटील यांचा सेवा निवृत्ती निमित्त रविवारी २५ जून २०२३ रोजी सत्कार करण्यात आला. यावेळी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, माजी नगराध्यक्ष प्रभाकरराव चव्हाण, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, बबनलाल अग्रवाल, नगरपरिषद मुख्याधिकारी तुषार नेरकर, प्रशासकीय अधिकारी संजय हासवानी, माजी उपनगराध्यक्ष सुरेश बागुल, नाटूसिंह गिरासे, पूनाभाई चौधरी, नारायणभाई पटेल शहादा, भरतभाई पटेल नंदुरबार, जितेंद्र पटेल शहादा, पी. के. पाटील शहादा, दिनेशभाई पाटील, संदीप चौधरी, शहरातील व तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल म्हणाले की, शिरपूरची सूत्रे १९८५ मध्ये हाती घेतली तेव्हा भीषण परिस्थिती होती. भविष्याच्या गरजा लक्षात घेऊन नियोजन केले. त्याला अधिकाऱ्यांनी उत्तम साथ दिली.

# शांताई बहुउद्देशीय संस्थेमार्फत वडजाई येथे वृक्षारोपण

**धुळे । प्रतिनिधी**

येथील शांताई बहुउद्देशीय संस्थेमार्फत वडजाई येथे वृक्षारोपण आणि प्रबोधन अशा संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे येथील विचारवंत प्रा. विलास चव्हाण होते. वृक्ष लागवड सप्ताह निमित्ताने वडजाई येथील 'शांताई वानप्रस्थाश्रम' परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक शांताई बहुउद्देशीय संस्थेचे उपाध्यक्ष व्ही. टी गवळे यांनी केले तर आभार प्रदर्शन परिवर्तनाचे वादळ या वैचारिक कार्यक्रमाचे संचालक राजेंद्र थोरात यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य शिवाजी बैसाणे, दिलीप नाईक, लोटन वाघ, कवि रवि पानपाटील, भैया पाटील, माजी सरपंच सूर्यवंशी, अमर नाना मोरे, किशोर शेजवळ, बी. बी. साळवे, भैया पाटील, अमोल पवार, माधवी पवार, ललिता शिरसाठ, भारती शिंदे, किशोर वाकळे , राजू वाकळे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा शेवट सुरूची भोजनाने करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन संस्थेचे अध्यक्ष इंजी. जी. बी. पवार, उपाध्यक्ष व्ही. टी. गवळे, सचिव माधवी पवार, इंजिनिअर अमोल पवार यांनी केले.

# शिंदखेडा महाविद्यालयात राजमाता जिजाऊ युवती संरक्षण व प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ

**शिंदखेडा । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या संकल्पनेतून महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवित आहेत. युवतींना कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याचे लढण्याचे प्रशिक्षण देऊन त्यास आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी शिंदखेडा येथील श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कै शं.दे. पाटील उर्फ बाबुराव दादा साहित्य, वाणिज्य आणि कै.भाऊसाहेब.म.दि.सिसोदे विज्ञान महाविद्यालय शिंदखेडा येथे राजमाता जिजाऊ युवती संरक्षण व प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ ३०० महाविद्यालयीन युवतींच्या सहभागाने करण्यात आला.



शिबिराचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार मल्हारराव पाटील यांनी आपल्या मनोगतातून समाजातील विविध घटनांमुळे महिलांच्या मनात निर्माण झालेली भीती घालवून आत्मविश्वास पूर्ण स्वसंरक्षणाची मानसिकता निर्माण करण्याच्या हेतूने सदर प्रशिक्षण दिले जात आहे. यातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेऊन भविष्यात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्याची मानसिकता तयार करण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महिला बाल विकास संरक्षण अधिकारी चंद्रकिरण सिसोदे, कल्पना भागवत, भारतीय स्त्री शक्ती संस्थेचे अध्यक्ष सुजाता शंखपाळ, पोलीस उपनिरीक्षक मिलिंद पवार उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी केले.

# मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित भूपेशभाई पटेल ग्रीन आर्मी कडून वृक्षारोपण

**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील खंबाळे येथे आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित भूपेशभाई पटेल ग्रीन आर्मी कडून वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाला शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त सौ. कृतिबेन भूपेशभाई पटेल, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टच्या संचालिका कु. द्वेता भूपेशभाई पटेल उपस्थित होते.



माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या वर्षी २५ ऑगस्ट २०२२ रोजी त्यांच्या वजना इतकी बीज तुला करण्यात आली होती. त्यानंतर त्या बिया चे रोपे तयार करून यावर्षी वृक्षारोपण मोहीम सुरू करण्यात आली आहे. खंबाळे येथील शाळेपासून वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला असून या ठिकाणी मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टच्या संचालिका कु. द्वेता भूपेशभाई पटेल यांच्या शुभ हस्ते तसेच शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्त सौ. कृतिबेन भूपेशभाई पटेल यांच्या हस्ते देखील वृक्षारोपण करण्यात आले. मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, प्राचार्य आर.एन.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत सर्व विद्यार्थ्यांनी भूपेशभाई ग्रीन आर्मी कडून मिळालेली १०० वृक्ष लावले. यात आवळा, चिंच, सीताफळ, शेवगा या रोपांचा देखील समावेश आहे. त्यानंतर मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट कडून विद्यार्थ्यांना जेवणा साठी १०० ताटे व्ही.एस.बेलदार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

कार्यक्रमाला मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट समन्वयिका सौ. पौर्णिमा पाठक, डॉ. सुप्रिया पंतवैद्य, स्विय सहाय्यक सुनील जैन, योगेश्वर माळी, महेंद्र माळी, भुपेशभाई ग्रीन आर्मीचे धीरज माळी, गणेश माळी, रिहानसिंग पावरा उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी शिक्षक डी.ए.पावरा, एस.डी.पाटील, आर.यु.पवार, आर.एल. तवर, पी.बी. वाघ, व्ही.एन. दोरीक, ए.बी.महाजन, एम.जी. अहिरे, एम.झेड. पाटील, सी.एन.पाटील, एम.आय.मुसलमान, एस.आर. जाधव, एम.के. पावरा, गुजराथी, चुनीलाल पावरा यांनी प्रयत्न केले.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# छगन भुजबळ यांचे सिन्नरमध्ये मोठया जल्लोषात स्वागत











नाशिक । राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांचे सिन्नरमध्ये मोठया जल्लोषात स्वागत करण्यात आले. मंत्री मंडळात समावेश झाल्यानंतर ना. भुजबळ हे प्रथमच सिन्नरमध्ये दाखल झाले. यावेळी ढोल ताश्यांच्या गजरात, फटाक्यांच्या आताशबाजीमध्ये मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना, समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. यावेळी समता परिषदेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र जगझाप, विशाल चव्हाण, राजेंद्र भगत, संदीप भालेराव, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सूभाष कुंभार, जिपचे माजी सदस्य ड.राजेंद्र चव्हाणके, माजी नगराध्यक्ष विठ्ठलराजे उगले, भाजपाचे निवडणूक प्रभारी जयंत आव्हाड, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब पवार, शहराध्यक्ष बाळासाहेब हांडे, शिवसेना तालुकाप्रमुख शरद शिंदे पाटील, माजी नगराध्यक्ष नामदेव लोंढे, नामदेव लोणारे, डॉ. सदाशिव लोणारे, मनोज महात्मे, कृष्णाजी कासार, हर्षल देशमुख, राहुल बलक, दिगंबर पगर, युगेन क्षत्रिय, मल्लू पाबळे, लक्ष्मण बर्गे, वंचित बहुजन आघाडीचे प्रवीण जाधव, प्रवीण जगताप, शरद इलग, कैलास निरगुडे, दत्ता हांडे, भगवान सटवे, अनिल गायकवाड, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष मंगल कुऱ्हाडे, शहराध्यक्ष मनीषा माळी, समता परिषदेच्या महिला अध्यक्ष मेघा दराडे, कुंदेवाडीच्या सरपंच निर्मला माळी, समताचे जेष्ठ नेते चंद्रकांत माळी, भगीरथ माळी, सुनील माळी, अर्चना जाधव, चेताली दराडे, भाजपा महिला आघाडीच्या सविता कोठूरकर, प्रियांका द्विवेदी, डॉ. श्रीमाळी, समाधान केकाण, प्रिया लहामगे, हितेश वर्मा, मुकुंद खर्जे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# नविन नाशकात चारचाकी वाहनांची तोडफोड



















नाशिक

। जिल्ह्यातील प्रभाग क्रमांक २५ मध्ये डॉ. हेडगेवारनगर येथे काल रोजी मध्यरात्री अज्ञात टवाळखोरांकडून १६ ते १७ गाड्यांच्या काचा फोडण्यात आल्या. यामुळे परिसरात दहशत माजवण्याचा प्रकार घडविण्यात आले असल्याचे लक्षात येते. मोठ्या प्रमाणावर तोडफोड झाल्याने वाहनांचे मोठे नुकसान झाले असून त्याची भरपाई कोण करणार? यामागचे खरे सूत्रधार कोण आहेत? हे शोधून पोलिसांनी संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे. तर या भागात बंदोबस्त वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान यावेळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन या ठिकाणी आ. सीमा हिरे, माजी नगरसेविका भाग्यश्री ढोमसे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ, अंबड पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी यांनी समक्ष जाऊन पाहणी करून भागातील लोकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आ सीमा हिरे व भाग्यश्री ढोमसे यांनी परिसरातील नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. तर दोषीवर कडक कारवाई करण्यात येईल असे आश्वासनही दिले आहे. नवीन नाशिक किंवा सिडको असे समजले जाणाऱ्या या भागात अधून-मधून वाहनांची जाळपोळ करणे, वाहनांच्या काचा फोडणे आदी प्रकार घडवले जातात. एक प्रकारे दहशत माजवण्याचा प्रयत्न यातून दिसत असल्याने पोलिसांनी या मागचे खरे सूत्रधार शोधून त्यांना गजाआड करावे अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान या घटनेमुळे परिसरामध्ये दहशत पसरली असून खळबळ उडाली आहे. आपली वाहने कुठे सुरक्षित ठेवता येईल? याचाही काही जणांनी आता शोध सुरू केला आहे. जागा कमी असल्याने काही जणांची वाहने ही रस्त्यावर किंवा मोकळ्या जागेत घरापासून दूर उभी केली जातात. नेमका याचाच फायदा काही समाजकंटक हे उचलत असल्याचे लक्षात येते.